Exh. 34/B

रे. क. नं. ५/२०२६

मे. दिवाणी न्यायाधिशसो क. स्तर कागल

यांचे कोर्टात....

श्री सुनिल नारायण कांबळे —— वादी

विरूध्द

श्री. भिकाजी शिवाजी इंगळे —— प्रतिवादी

वगैर

order

R&R

यातील प्रतिवादी नं. १ तर्फे वादीच्या दाव्यास कैफियत व तूर्तातूर्त मनाई अर्जास लेखी म्हणणे पुढीलप्रमाणे —

१. वादी यांचा दावा व तुर्तातुर्त मनाई अर्ज साफ खोटा, चुकीचा, लबाडीचा असून तो कायद्यातील तरतुदी प्रमाणे नाही. त्या कारणाने वादींचा दावा तुर्तातूर्त मनाईचा अर्ज कोर्ट खर्चासह नामंजूर करणेत यावा.

२. वादी यांनी दावा मिळकत गट नं. ७१७ मौजे कापशी ता कागल जि. कोल्हापूर असे असलेचे नमुद केले आहे. सदरचे प्रतिवादी नं. १ हे सदर मिळकतीमधील सहहिस्सेदार असल्याकारणाने व त्यांच्या स्वतंत्र मालकी कब्जे वहिवाटीच्या मिळकतीमध्ये सुरू

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

केलेल्या बांधकामा बाबतची संपूर्ण माहिती अगदी सुरूवाती पासून म्हणजेच पूर्वीचे जिर्ण झालेले बांधकाम पाडून नविन बांधकाम सुरू करणार असले पासूनची पुर्ण माहिती व कल्पना यातील वादी यांना होती व आहे. असे असता केवळ प्रतिवादी यांचे बांधकाम अर्धवट अवस्थेत असताना हेतूपुरस्कररित्या व आकस हेतूने ते बंद पाडण्याच्या दृष्ट हेतूने प्रस्तुतच्या दाव्याची रचना केलेली आहे. त्यामुळे वादींचा दावा व तुर्तातूर्त मनाई अर्ज नामंजूर करणेत यावा.

३. वादींनी दावा मिळकतीचे दावा अर्जी कलम १ मध्ये दिलेले वर्णन प्रस्तुत प्रतिवादी यांना अमान्य व नाकबुल आहे. तशा वर्णनाची मिळकत अस्तित्वात असल्याबाबतची बाब वादींनी पुराव्यानिशी शाबीत करावी.

४. वादी यांच्या दावा अर्जी कलम २ मधील मजकूर म्हणजे " वादी यांनी दावा मिळकती ही दिनांक १०/०१/२०१५ इ रोजीचे रजिस्टर दस्त ———————————————————— प्रतिवादी नंबर १ यांनी देखील घर बांधले होते." हा संपूर्ण मजकूर साफ खोटा, चुकीचा, साधनीभूत व मा. न्यायालयाची दिशाभूल करणारा असा असून प्रस्तुत प्रतिवादी त्यामधील एकुणएक मजकुराचा/कथनांचा स्पष्टपणे इन्कार करतात. वादी यांनी दावा मिळकत ही दिनांक १७/०१/२०२५ इ रोजी दस्त नंबर १२९/२०१५ ने व दिनांक १२/०४/२०१६ इ रोजीचे रजिस्टर दस्त नंबर ७१६/२०१६ ने मा. दुय्यम निबंधकसो श्रेणी १ मुरगुड यांचे कार्यालयातुन खरेदीपत्र करून घेवुन खरेदी घेतलेली मिळकत

Assit. Supdt.

आहे. सदर खरेदी मिळकत ही एकूण हे. ०.०२.२५ आर या मधील दावा मिळकतीचे क्षेत्र हे. ०.०१ आर ज्याची लांबी ५६ फुट व रूंदी १९ फुट अशी आहे. सदर वादी यांनी दिनांक १९/०१/२००९ इ रोजी प्रतिवादी नंबर ४ यांचे बरोबर ९९ वर्षाचे कालावधीचे करारपत्र करून वर नमुद लांबी ५६ रूंदी १९ फूटाचा हे. ०.०१ आर क्षेत्राची दावा मिळकत घेतलेली होती. त्यानंतर दि. १७/०१/२०१५ इ रोजी दावा मिळकतीची खरेदी प्रतिवादी नं. ४ यांचे कडून करून घेतली. हा संपूर्ण मजकूर साफ खोटा, चुकीचा, साधनीभूत व मा. न्यायालयाची दिशाभूल करणारा असा असून प्रस्तुत प्रतिवादी त्यामधील एकुणएक मजकुराचा/कथनांचा स्पष्टपणे इन्कार करतात. वादी यांच्या दि. १५/०१/२०१५ इ रोजी दस्त नंबर १२९/२०१५ ने नोंदविलेल्या दस्तामध्ये पुर्वेस – याच नंबर मधुन सोडलेला रस्ता, पश्चिमेस – लिहुन देणार यांची शिल्लक जमिन, दक्षिणेस – लिहुन देणार यांची शिल्लक जमिन, उत्तरेस – लिहुन देणार यांची शिल्लक जमिन या चर्तुसिमेतील दावा मिळकत वादी यांची होती व आहे. त्यामुळे वादी यांची दावा मिळकत वर कलम १ यात वर्णन केल्या प्रमाणे अस्तित्वात कधीही नव्हती व नाही. तसेच वादी यांच्या कथनाप्रमाणे दावा वाद मिळकतीची लांबी ५६ फुट व रूंदी १९ फुट अशी नमुद असून ती कोणत्या दिशेची किती आहे याची देखील अपूरी किंबहूना पुर्व–पश्चिम किती फुट किंवा दक्षिण – उत्तर दिशेने किती फुट आहे याचे कोणतेही मोजमाप वादी यांनी दावा मिळकतीमध्ये नमुद केलेले नाही किंबहूना त्यांच्या करारपत्रामध्ये व खरेदी पत्रामध्ये देखील नमुद नाही. त्या कारणाने

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

देखील वादी कथन करत असलेली वाद मिळकत व त्यामधील वादींचे क्षेत्र नेमके वादी कथन करतात तिथे येत असलेबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा या कामी दाखल केलेला नाही. दावा मिळकतीबाबत हददीबाबत अगर स्वतंत्र वहिवाटीबाबत वादी यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा या कामी दाखल केलेला नाही. वादी यांनी दावा वाद मिळकतीचे वर्णन व त्यांनी हजर केलेली कागदपत्रे पाहता वाद मिळकतीचे कोणतीही स्पष्टता दिसून येत नाही. तसेच ज्या काही चर्तुसिमा आहेत त्या देखील वेगवेगळया नमूद केलेल्या असून दावा वाद मिळकतीशी त्याचा कोणताही कसलाही संदर्भ लागत नाही त्या कारणाने सुध्दा वादी यांनी दाखल केलेला दावा व मनाई अर्ज कोर्ट खर्चासह नामंजूर होणे कायदयाच्या दृष्टीने योग्य असे आहे. त्यानंतर प्रतिवादी नं. १ यांनी देखील प्रतिवादी नंबर ४ यांचेकडून खरेदीपत्र करून घेतलेले असुन प्रतिवादी नंबर २ व ३ यांनी दिनांक २५/०७/२०१९ इ रोजी प्रतिवादी नंबर ४ यांचे बरोबर प्रतिवादी नंबर २ व ३ यांनी नोटरी करारपत्र करून घेतलेले असून सदरचे करारपत्रामध्ये प्रतिवादी नंबर ३ यांनी चतु:सिमेमध्ये दक्षिणेस वादी यांच्या नावाचा उल्लेख केलेला असून प्रतिवादी नंबर २ यांनी देखील वादी हे उत्तरेस असलेचा उल्लेख केलेला आहे. सदर वादी व प्रतिवादी नंबर ३ यांचे पती चंद्रकांत नारायण कांबळे दोहोंनी मिळून एकत्रितरित्या घर बांधलेले होते. सदर चंद्रकांत कांबळे हे मयत झालेनंतर प्रतिवादी नंबर ३ व त्यांचा मुलगा सुहास चंद्रकांत कांबळे हे सदर घरामध्ये राहत होते. तसेच सदर प्रतिवादी नं. १ यांनी देखील प्रतिवादी नंबर ४ यांचेकडून हे. ०.०१ आर क्षेत्र प्रतिवादी नंबर ३ यांच्या उत्तरेस

Assit. Supdt.
Civil Court Jr Dn. Kagal

घेतलेले होते. तेथे प्रतिवादी नंबर १ यांनी देखील घर बांधले होते. हा संपूर्ण मजकूर साफ खोटा, चुकीचा, साधनीभूत व मा. न्यायालयाची दिशाभूल करणारा असा असून प्रस्तुत प्रतिवादी त्यामधील एकुणएक मजकुराचा/कथनांचा स्पष्टपणे इन्कार करतात. प्रतिवादी नं. १ यांची वर नमुद वादमिळकती मध्ये कोणत्याही चर्तुसिमेलगत कोणतीही मिळकत नव्हती व नाही. प्रतिवादी नं. १ यांचा वादी यांच्या मिळकतीशी किंबहूना दावा वाद मिळकतीशी कोणताही कसलाही संबध नसताना वादी यांनी प्रतिवादी यांना नाहक त्रास देण्याचे दृष्ट हेतूने व बांधकाम थांबविणेच्या हेतून पक्षकार केलेले आहे. वादी यांच्या दावा मिळकतीचे केलेले वर्णन हे पूर्णत: चूकीचे असून दाव्यामध्ये नमूद हे. ०.०२.२५ आर क्षेत्र नेमके कोठे येते याबाबत स्पष्टता नाही. तसेच वादींच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी नं. १ यांनी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केली असल्याची बाब खोटेपणाने नमुद केली आहे. सदर अतिक्रमणाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा प्रस्तुत कामी दाखल केलेला नाही. तसेच दावा मिळकतीचे वर्णन देखील अतिक्रमणाबाबत योग्य पध्दतीने नमूद केलेले नाही. दाव्यातील वादींची कथने देखील संदिग्ध व मानस येतील अशी आहेत. सदर कथनांना कोणताही कायदेशीर आधार नाही अगर कागदोपत्री पुरावा देखील नाही. वादी यांच्या कथनांवरूनच वादी यांना तुर्तातुर्त मनाई सारखा इक्वीटेबल रिलीफ समतेच्या न्यायतत्वाप्रमाणे मागता अगर देता येण्यासारखी नाही. त्या कारणाने वादींचा दावा तुर्तातूर्त मनाईचा अर्ज कोर्ट खर्चासह नामंजूर करणेत यावा.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

५. वादी यांच्या दावा अर्जी कलम ३ ते ४ मधील मजकूर म्हणजे “ सदर वादी प्रतिवादी नं. १, प्रतिवादी नं. ३ यांची एकमेकाला लागुन घरे असुन ———————————————————— प्रतिवादी यांचे विरूध्द सदरचा दावा दाखल करणे भाग पडले आहे.” हा संपूर्ण मजकूर साफ खोटा, चुकीचा, साधनीभूत व मा. न्यायालयाची दिशाभूल करणारा असा असून प्रस्तुत प्रतिवादी त्यामधील एकुणएक मजकुराचा/कथनांचा स्पष्टपणे इन्कार करतात. प्रतिवादी नं. १ यांची घर मिळकत ही फार वर्षापूर्वीची असून त्या मिळकतीच्या सर्व भिंती हया अतिशय जीर्ण झालेल्या होत्या मागील बाजूची भिंत ही जीर्ण होवून पडलेली देखील होती व आहे. सदर घर मिळकतीचे कैलारू छत देखील पावसाळयामध्ये पाणी आत येवून खराब झाले असल्याने ते कधीही पडण्याच्या अवस्थेत होते त्यामुळे प्रतिवादी नं १ यांना नाईलाजाने पूर्ण घर काढून जमीन लेवल करून नवीन घर बांधणे भाग पडले अशी वस्तुस्थिती आहे. वादीला या सर्व गोष्टीची माहिती आहे असे असताना प्रतिवादींना नाहक त्रास देणेच्या उद्देशाने वादीने सदरचा दावा व मनाईचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी नं. १ गावातच दुस—याच्या घरी भाडयाने राहत आहेत याची माहिती वादीस आहे. घर पाडून बांधल्याशिवाय प्रतिवादीस दुसरा कोणताही पर्याय नाही व गेली बरीच वर्षे प्रतिवादी आपल्या स्वत:च्या मालकी वहिवाटीच्या मिळकतीमध्ये राहत होते वादीला याची प्रत्यक्षात माहिती होती वा आहे. वादीने त्यासंबधी कधीच कोणाकडे अतिक्रमणबाबत तक्रार केली नव्हती व नाही किंबहूना तशी तक्रार

Asstt. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

असण्याचे कोणतेंही कारण नव्हते अगर नाही. वादी यांनी त्यांच्या दावा अर्जी कलम ४ मधील मजकुरामध्येच कथन केलेले आहे की सदर वादी यांचे लगत हिस्सेदार प्रतिवादी नं. २ व ३ यांनी दिनांक २५/०७/२०१९ इ रोजी करून घेतले नोटरी कारारपत्रा नंतर यातील प्रतिवादी नंबर ४ यांनी दिनांक २४/०६/२०२१ इ रोजी दस्त नंबर १२४९/२०२१ या दस्तान्वये गट नंबर ७१४ मधील क्षेत्र प्रतिवादी नंबर २,३ व इतर बरेच यांना प्रतिवादी नंबर ४ यांनी खरेदीपत्रे करून दिलेली होती. हे वादी यांनी आपल्या दावा अर्जी कलम ४ मध्ये कथन केलेले असून वादी यांचे दाव्याच्या चर्तु:सिमे मध्ये कोठेही प्रतिवादी नं. १ यांची मिळकत येत नसतानाही त्यांना नाहक त्रास व्हावा व त्यांचे आर्थिक नुकसान व्हावे या एकमात्र दृष्ट हेतून वादी यांनी प्रतिवादी नं. १ यांना जाणीवपूर्वक पक्षकार केलेले आहे. वादी यांनी कोठेही दाव्यामध्ये तसेच मनाई अर्जामध्ये प्रतिवादी नं. १ यांनी वादी यांच्या वाद मिळकतीमध्ये किती बांधकाम केलेले आहे किंवा किती फुट अतिक्रमण केलेले आहे असे नमुद केलेले नाही. प्रतिवादी नं. १ यांची मिळकत ही वादी यांचे चर्तुसिमेस लगत कधीही नव्हती व नाही त्यामुळे प्रतिवादी नं. १ हे वादी यांचे वाद मिळकतीमध्ये अतिक्रमण करून बांधकाम करणेचा प्रश्नच उदभवत नाही.

६. वादींनी दावा अर्जी कलम ५ मध्ये दाव्यास नमुद केलेले कारण साफ खोटे, चुकीचे, काल्पनिक असे असून वादींनी नमुद केल्याप्रमाणे त्यांच्या दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही. जे काही घडलेचे नमूद केले आहे ते साफ खोटे असून केवळ प्रस्तुत

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

दाव्यास काहीतरी कारण असावे म्हणून त्यांनी तसे कारण नमुद केले आहे. मुळातच वादींच्या दाव्यास कोणतेही कारण घडले नसल्या कारणाने वादींचा दावा व तुर्तातूर्त मनाई अर्ज नॉन कॉज ऑफ ॲक्शनच्या कारणावरून नामंजूर करणेत यावा.

७. वादी यांनी सदरचा दावा हा हदद निश्चित होवून आदेशात्मक आदेश व कायम स्वरूपाचे मनाई करीता मनाईचा दावा यातील प्रतिवादी नं. १ व इतर प्रतिवादी हे सदर दावा गट नं. ७१४ मध्ये असणारे सहहिस्सेदारांचे विरूध्द दाखल केलेला आहे. वास्तविकता सदर गट नं. ७१४ मध्ये अन्य १०० किंबहून त्याहून अधिक सहहिस्सेदार असून व त्यांना देखील यांतील प्रतिवादी नं. ४ यांनी याच दावा वाद मिळकतीमधील मिळकती खरेदी दिलेल्या आहेत त्याकारणाने त्यांना सदर दावेत पक्षकार म्हणून समाविष्ठ न केलेने सदर दावेस व मनाई अर्जास सी.पी.सी. ऑ १ रूल ९ चे तरतुदीची बाधा येत असलेने वादी यांना तुर्तातुर्त मनाई सारखा इक्वीटेबल रिलीफ समतेच्या न्यायतत्वाप्रमाणे मागता अगर देता येण्यासारखी नाही. त्या कारणाने वादींचा दावा व तुर्तातूर्त मनाईचा अर्ज कोर्ट खर्चासह नामंजूर करणेत यावा.

८. दाव्याचा तपशील, केलेली अकारणी ही पूर्णपणे चुकीची असून ती कायद्यातील तरतुदीप्रमाणे अशी नाही.

९. वादींनी दावा अर्जी कलम २० मध्ये विनंती केल्याप्रमाणे जशा दादी मागत आहेत तशा दादी त्यांना मुळातच मागता अगर देता

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

येणार नाही अगंर देता देखील येणार नाहीत. याकारणाने सुध्दा वादींचा दावा व तुर्तातूर्त मनाईचा अर्ज फेटाळणेत यावा.

१०. वादींच्या तुर्तातूर्त मनाई अर्जातील कथने व दाव्यातील कथने ही एकसारखीच असल्याने व दाव्यातील संपूर्ण कथने व मजकूर प्रस्तुत प्रतिवादींनी स्पष्टपणे नाकारलेला असल्याने तुर्तातूर्त मनाई अर्जातील कथने स्वतंत्ररित्या नाकारलेली नाहीत तथापि त्यातील संपूर्ण मजकूराचा व कथनांचा प्रस्तुत प्रतिवादी स्पष्टपणे इन्कार करतात. केवळ पुनरावृत्ती होवू नये या हेतूने प्रतिवादीनी वादींच्या तुर्तातूर्त मनाई अर्जातील कथनांच्या अनुशंगाने या कैफीयती मध्ये स्वतंत्रपणे कथने करून ती नाकारलेली नाहीत. तथापि प्रस्तुत प्रतिवादी वादींच्या तुर्तातूर्त मनाई अर्जातील संपूर्ण मजकूराचा स्पष्टपणे इन्कार करतात.

११. वादींना सकृतदर्शनी केस नाही. न्यायाचा तराजू व सोयीचे समतोलत्व वादींच्या लाभामध्ये नाही तर ते प्रतिवादी यांच्या लाभामध्ये आहे. वादींनी मा. न्यायालयापासून अनेक बाबी लपवून ठेवून या खोटया दाव्याची रचना केलेली आहे. वादी न्यायालयामध्ये स्वच्छ हाताने आलेले नाहीत. त्यांची वर्तणूक प्रामाणिक हेतूची नाही. वादींनी मा. न्यायालयापासून खऱ्या गोष्टी लपवून ठेवून व खोटी कथने करून वादीच्या दावा मिळकती मध्ये करत असलेला किंबहूना केला असल्याबाबतचा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल न करता केवळ सातबारा उता—यावर नाव असले गोष्टीचा गैरफायदा घेवून प्रस्तुत प्रतिवादींचे बांधकाम सुरू असल्याच्या कारणावरून त्यांनी वादींच्या मिळकतीमध्ये बांधकाम

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

करण्याचा प्रयत्नं सुरू केला आहे असे केलेले कथन कोणत्याही पुराव्या शिवाय असे असल्या कारणाने वादींची दाव्याच्या कामी व तुर्तातूर्त मनाई अर्जाच्या कामी मागितलेली दाद मुळातच त्यांना मंजूर करता येणारी नाही. या सर्व कारणावरून सुध्दा वादींचा दावा व मनाईचा अर्ज फेटाळणेत यावा.

१२. वादींच्या मागणीप्रमाणे प्रतिवादींच्या विरूध्द तुर्तातुर्त मनाईचा आदेश झाल्यास प्रतिवादींच्या कायदेशीर कृत्याला प्रतिबंध केल्यासारखे होणार आहे. प्रतिवादी कायदा पाळणारे व मानणारे इसम असून ते अतिशय गरीब आहेत. त्यांनी बरीचशी रक्कम खर्ची करून घर बांधकाम करीत आहेत. त्यामुळे प्रतिवादींच्या कायदेशीर कृत्यास वादींना ढोबळमानाने खोटी, चुकीची कथने करून व तथाकथित कथने करून मनाई सारखी ऐच्छीक दाद मागणी केली आहे तशी ती त्यांना कायद्याने मागता अगर देता येणार नाही.

१३. प्रस्तुतचा दावा हा केवळ वादी हे खटाटोपी, व्यापक रणारे इसम असल्याने खोटया दाव्याची रचना करून वादींनी प्रतिवादींना नाहक मानसिक, आर्थिक, शारीरीक त्रासामध्ये टाकले आहे. त्यामुळे वादींनी केलेल्या त्रासापोटी वादी हेच खोटे कोर्ट केसीस मे. कोर्टात दाखल करतात व विनाकरण प्रतिवादींना सर्वतोपरी त्रास देण्याचा प्रयत्न करतात हे प्रस्तूत दावा दाखल करून वादीने शाबित केले आहे. वादी व त्यांचेतर्फे सर्व इसमांनी उपस्थित केलेल्या वादामुळे भांडणतंटयामुळे प्रतिवादी यांना वारंवार पोलीस स्टेशन, तहसिलदार ऑफिस, कागल न्यायालय व अन्य ठिकाणी वेळोवेळी पैसे खर्च

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

करून यावे लागते. वादी यांच्या गैरकृत्यामुळे प्रतिवादी हे आर्थिक अडचणीत आले आहेत. या सर्व गैरकृत्यामुळे वादींविरूध्द कॉम्पेन्सेटरी कॉस्ट रक्कम रू. २,००,०००/— इतकी रक्कम देणेबाबत आदेश होणे आवश्यक आहे. या शिवाय अशा प्रकारची खोटया दाव्यांची रचना करून खोटी कारणे देवून वेगवेगळया कारणाने बनावट दावे वादी (Vexatious Litigation) करत असून त्यामुळे मे. कोर्टाचा वेळ वाया जात आहे. त्यामुळे प्रस्तुतचा दावा हा केवळ Abuse Process of Law आहे. त्यामुळे दावा खर्चासह नामंजूर होवून कॉम्पेन्सेटरी कॉस्ट मिळणे न्यायाचे दृष्टीने योग्य आहे.

१४. सबब, प्रतिवादी यांची विनंती की,

अ. वरील सर्व कारणांचा विचार होवून वादींचा दावा व तुर्तातुर्त मनाईचा अर्ज कोर्ट खर्चासह नामंजूर करणेत यावा ही विनंती.

ब. वादींनी प्रस्तुतचा खोटा दावा केलेने त्यांना कंपेन्सेटरी कॉस्ट म्हणून रक्कम रू. २,००,०००/— इतकी कॉस्ट करून ती प्रतिवादी नं. १ यांना देणेबाबतचा मे. कोर्टाचा आदेश होवून मिळावा.

क. जरूर तर कारणपरत्वे कैफियत दुरूस्तीस अगर जादा कैफियतीस परवानगी असावी.

ड. इतर अनुषंगीक दादी न्यायाचे कारणास्तव याच कामी व्हाव्यात.

येणेप्रमाणे कैफियत व म्हणणे असे...

कागल

ता. १०/०४/२०२६ प्रतिवादी नं १ तर्फे वकिल प्रतिवादी नं. १

प्रतिज्ञा

प्रतिवादी नं. १ भिकाजी शिवाजी इंगळे व.व. ६१ धंदा – शेती रा.उदय नगर, कापशी ता. कागल जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील कैफियत व म्हणणे मधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली सत्य प्रतिज्ञा आज मुा कागल ता. १०/०४/२०२६

प्रतिवादी नं. १

ॲफिडेव्हिट

प्रतिवादी नं. १ भिकाजी शिवाजी इंगळे व.व. ६१ धंदा – शेती रा.उदय नगर, कापशी ता. कागल जि. कोल्हापूर शपतेवर कथन करतो की, वरील कैफियत व म्हणणे मधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले ॲफिडेव्हिट आज रोजी मुा कागल दि.१०/०४/२०२६

ॲफिडेव्हिट करणार
यांना मी ओळखतो.

ॲफिडेव्हिट करणार

(Adv. V. A. Khot)
ॲडव्होकेट

Asstt. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

प्रतिज्ञा

प्रतिवादी नं. १ भिकाजी शिवाजी इंगळे व.व. ६१ धंदा — शेती रा.उदय नगर, कापशी ता. कागल जि. कोल्हापूर शपतेवर कथन करतो की, वरील ॲफिडेव्हिट मधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले प्रतिज्ञा आज रोजी मुाा कागल दि. १०/०४/२०२६ इ रोजी.

प्रतिज्ञा करणार

Solemnly Affirmed before me by
Shri. Bhikaji Shivaji Ingle
Age 61 of Kapsi, Kagal who is
identified by Shri V. A. Khot
............whom I know personally
Dated :- 10/4/26

Assistant Superintendent

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.04.10 15:39:05 +0530